# मेट्रो ३ मार्गामुळे नागरिकांच्या समस्या सुटतील

## आदित्य ठाकरेंना विश्वास : भुयारीकरणाचा २५ वा टप्पा पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

वाहतुकीच्या दृष्टीने कुलाबा-वांद्रे सीप्झ हा मेट्रो मार्ग महत्त्वाचा प्रकल्प आहे. यामुळे मुंबईकरांच्या रोजच्या प्रवासाच्या समस्या सुटतील. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे प्रतिपादन पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी केले. मेट्रो ३ च्या भुयारीकरणाचा २५ व्या टप्पा बुधवारी वरळी येथे पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

मेटो -३ मार्गिकेवरील काम प्रगतीपथावर असल्याचे बघून आनंद वाटला. प्रकल्पाचे आतापर्यंत जवळपास ७८ टक्के भुयारीकरण व ५० टक्क्याहून अधिक बांधकाम पूर्ण झाले आहे. एमएमआरसी याच उत्साहाने व गतीने प्रकल्पाचे काम सुरू ठेवेल, असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला. मेट्रो ३ च्या पर्यायी कारशेडसाठीच्या जागेसाठी नेमलेल्या चार सदस्यीय समितीने आपला अहवाल मुख्यमंत्र्यांकडे पाठवला असून हा अहवाल राज्य सरकारसाठी बंधनकारक नसल्याचे ते म्हणाले. पॅकेज-३ चे टनेल बोअरिंग मशीन 'तानसा-१' सायन्स म्युझियमच्या उत्तर दिशेपासून २७ सप्टेंबर २०१८ रोजी कार्यान्वित झाले. भौगोलिक आव्हानांना सामोरे जाऊन अप लाईन बोगदयाचे २०७३ मीटर भुयारीकरण पूर्ण केले. या भुयारीकरणासाठी १३८१ सेगमेंट रिंग्सचा वापर करण्यात आला. एकूण १७ टीबीएम सध्या ३३.५ किमी लांब मार्गिकेवर कार्यरत आहेत. याविषयी बोलताना मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल म्हणाले, प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचा मला आनंद आहे. आमच्या अभियंत्यांच्या व तज्ज्ञांच्या टीमने हे आव्हानात्मक काम अगदी सुलभ पार पाडले. आतापर्यंत उपनगरीय रेल्वेद्वारे न जोडली गेलेली मुख्य व्यापारी केंद्र पॅकेज-३ द्वारे जोडली जाणार आहेत. मेट्रो-३ कार्यान्वित झाल्यावर या भागात नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी नवसंजीवनी ठरेल, असेही देओल म्हणाले.

● एकूण ७ पॅकेज असलेल्या या मार्गातील पॅकेज-३ चा हा भुयारीकरणाचा पहिलाच टप्पा होता. मेट्रो -३ मार्गिकेतील पॅकेज-३ हे सर्वात लांब पॅकेज असून या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक व वरळी या स्थानकांचा समावेश आहे.



छाया : अजिंक्य सावंत